# प्रकरण पाचवें

आकृतिबंधाला धक्के देणारी कविता

ढसाळांच्या कवितेतील व्यक्तिचित्रण

"सूर्यवंशी" कविता: काही आक्षेप

नामदेव ढसाळ : दलित साहित्याचा मानदंड

संदर्भ, टीपा इ.

## प्रकरण पाचवे

## आकृतिबंधाला धक्के देणारी कविता

दलित कविता ही त्यांच्या जीवनातून निर्माण झालेली आहे. मात्र कविता लिहिताना कोणतीही विशिष्ट भूमिका मनांत नसते असे स्वानुभव नारायण सुर्वे, दयापवार यांनी सांगितलेले आहेत. दया पवार म्हणतात,

" कविता लिहिण्यापूर्वी तशी कोणतीही भूमिका मनांत नसते. एवढेच काय,कविता घडणार आहे याची पुसटशी जाणिवही नसते. एक मात्र खरे की,एखादी घटना, एखादे वाक्य किंवा दैनंदिन घटनांचा कार्यकारणभाव यातून मला कविता सुचते "

नारायण सुर्वे याबाबत लिहितात," अमुक एक भूमिका मनात वागवून कविता लिहिता असे कधीच घडले नाही"-- या सर्वांच्या मतांचा विचार करता ज्याला जसे आयुष्य भोगावे लागते,तसा त्याच्या कवितेचा रंग असतो हेच खरे !

अस्पृश्यतेच्या चिरंतन आगीखाली ज्यांची आयुष्यें होरपळून निघाली ती आयुष्यें आज अनेक प्रकारची कोंडी फोडून, वाट फोडून पुढे निघालेली

आहेत. शब्दांत बसणार नाहीत,एव्हढ्या कथा आणि व्यथा या दलित जीवनात आहेत. त्या हजारो वर्षांच्या आहेत, आणि त्या सांगत असतांना अक्षरश: ऊर फाटून जावा अशी अवस्था आहे. आत्मनिष्ठेचे बुलंद सामर्थ्य तिला लाभले आहे. सौ. कुमुद पावडे, यांनी लिहिलेले आहे, " दलित साहित्यिक हा जीवनाचा आनंद लुटणारा नाही. त्याच्या वाटयाला ते जीवन आले नाही, तर त्याच्या लेखनातून खोटा आनंद कुठून येईल ? आम्ही सारे अनुभूतिकार आहोत " -- अस्पृश्य जीवनात आलेले अनुभव निर्भीडपणे मांडणे हीच या साहित्यिकांची खरी भूमिका आहे.

दलितलेखक - कवींची भूमिका, साहित्य विधायक भूमिका दलित साहित्याच्या जन्मप्रक्रियेशी सुसंगत आहे.त्यांची साहित्याकडून निरागस आनंदाची भूमिका नाही. कारण निरागसतेचा अनुभव त्यांना कधी आलेलाच नाही.साहित्यकृतीचा अलिप्तपणे आस्वाद घेण्याइतके स्वास्थ्य हे त्यांना अभावानेच लाभले. दया पवार म्हणतात,

" पागलोटानं कचरा किना-यात
लोटावा तस आपलं आयुष्य "

नामदेव ढसाळ, त्र्यंबक सपकाळे,दत्ता भगत ह्या सा-यांनी हेच निवेदन केलेले आहे.

" मला आनंद देत नाही कुठल्या
सृष्टीच्या नाना लीला
मी असूच कसा,शांत समतोल
छळतात सारी शास्त्रे पुराणे वेदांत
गळा आवळणारे नाना पंथ "

कलावंताच्या भूमिकेतून म्हणून या दलित कवींची भूमिका कशी आहे ? ---- याचा विचार करता ललित वाङ्मयात आत्मनिष्ठेला प्राधान्य

असते हे मत सर्वमान्य होण्यासारखे आहे. पण ही आत्मनिष्ठा जितकी निरामय असते, उत्कट आणि आविचल असेल तितकी ती कलाकृती अधिक जिवंत, प्रभावी आणि परिणामकारक आहे. शब्दांची पूजा करणारा दलित कवी नाही. तो माणसांची आरती गाणारा आहे. ज्यांच्या जीवनात अंधार आहे, त्याच्या हाती सूर्य देणारी ही सूर्यवंशी कविता आहे.

भाकरीपेक्षा माणुसकीला मानणारी ही दलित कविता माणुसकीचे हक्क मिळत नाहीत म्हटल्यावर आपल्या मनातील प्रक्षोभ व्यक्त करताना कवितेच्या आकाराची, बाह्य "फॉर्म" ची ( Form ) फिकीर करीत नाही. नामदेव ढसाळांच्या कवितेत हे विशेषत्वाने जाणवते. या दृष्टीने त्यांच्या " माणसं भादरून "," माचिसाच्या चौथ्या भिंतीतून "," आवटोपसच्या संघटित जनान खान्याकडे " --- या व यासारख्या अनेक कविता बघण्यासारख्या आहेत. उदाहरणादाखल एखादीच कविता घेता येईल. जे स्वातंत्र्य मिळालं त्याचा उद्घोष चालू असतो, त्या स्वातंत्र्यानं सर्वसामान्य माणसाला काय दिले ? अन्न ? वस्त्र ? निवारा ? उलट स्वातंत्र्यानंतरचा सर्वसामान्य मनुष्य आता अधिक असुरक्षित, अस्वस्थ झालेला आहे. मानवी जीवनातला विसंवाद त-हेत-हेने वाढतोच आहे, अशा वेळेला या स्वातंत्र्याविषयीच्या प्रतिक्रिया ढसाळ व्यक्त करीत जातात.

" स्वा
तं
त्र्य
तीन अक्षरांची उबस लोकल रजिस्टरात
जिथं उसळ पावांची दैनंदिनी आम्ही रोज खरडतो "

असे हे जीवन - तेव्हा स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नांव आहे ? -- असे विचारणारा हा कवी आपल्या मनातील जाणीवा बेबंदपणे व्यक्त करीत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

जातो. "माणसाने" या कवितेतही त्याने काय काय करावे हे सांगत जाताना ढसाळ कवितेचा आकृतिबंध पूर्णपणे मोडत नेतात.

ढसाळांच्या या कवितातून आकड्यांची रेलचेलही दिसते.आकडे शब्दात नाहीत खालील उदाहरणे ही गोष्ट स्पष्ट करतात --

"निमित्त १५ ऑगस्ट ७१","आज मला २४वे वर्ष लागलं"," ९ महिने ९ दिवस कुठल्या घाटाच्या बैलाला झाल्य रेडा","मी कसे १५-८-४७ ला पायलं होतं एका बाजूला"," १ तांब्याला १० पैसे पडतात" "कॉम्रेड अर्थात १२ बलुतेदारासाठी","एकावर एक ११ एकावर दोन १२ चढे पर्यन्त", १७ पिढ्यांची","धंदेवाले ४२०" -- इ. अंक आणि आकड्यांच्या प्रमाणेच गणितातील अधिक ( + ) वजा ( - ), बरोबर ( = ) इ.चिन्हांचाही वापर ढसाळांनी आपल्या कवितातून केला आहे.

विधानाचे स्वरूप घेणारी किंवा आकृतिबंधाना धक्के देणारी ढसाळांची ही कविता पारंपरिक समीक्षक स्वीकारायला तयार आहेत काय ? हा मूलभूत प्रश्न आहे. कविता ही कला आहे. तिच्या मध्ये एका विशिष्ट क्रमाने, त-हेने शब्द यावेत, तिचा आकार अमुकच हवा असे म्हणण्याचा काळ आता मागे पडला आहे. आणि कवितेचा आकृतिबंध अनेकदा मोडू पाहणारी ही दलित कविता मराठी कवितेला निश्चितपणे वेगळे वळण देणारी आहे.

नामदेव ढसाळांच्या कवितेने घेतलेले आकार कवीने घेतलेल्या दीर्घ अनुभूतीचा पट उलगडीत जाणारा, त्याने अनुभवलेल्या दिवसामध्ये असलेल्या अंधाराला प्रकट करणारा आहे.आता इथे दीर्घ लिखाण कविता म्हणून स्वीकारण्यासाठी सुजाण वाचकाने स्वागतशील वृत्तीनेच पाहावयास हवे. मनाच्या पाटीवर जसजशा आठवणी गोळा होतात तसतशा त्या टिपल्या जातात.तिथे बंधन येत नाही, शब्दांचे ,कवितेच्या बाह्य आकारांचे किंवा छंदाचे !

मराठी कवितेचा विचार म्हणजे केवळ घाटाचा विचार [ तो कवितेचा समग्र विचार होऊन जात असतो.त्या कवितेचे सौंदर्य - शास्त्र हे घाटा-बंधाचे केवळशास्त्र होते. वृत्त-छंद,अलंकार,काव्यप्रकार ह्या गोष्टीच कवितेच्या नायकपदी असतात."कौशल्य मोठे रचनेत आहे " हेच तिचे ध्येय वाक्य असते. फॅार्म ( Form ) मध्ये यशस्वी बसणे ही कवितेच्या जीवित हेतूची सांगता ठरते. छंदवृत्तांची गणिते पाठ केली की,कवितेचे मग तयार उत्तर मिळते.मराठी रसिकतेने ही छंदसाच्यात बसणाऱ्या आज्ञाधारकतेला आणि वृत्तांची व्रताप्रमाणे शिस्त पाळीत शब्दांची दुकानदारी करणाऱ्या माणसाला कवीपदवीने गौरविले आहे . . . इहवास्तवाची अशी अवहेलना करणाऱ्यांनी कवितेच्या घाटाचीच तशी काळजी घ्यावी हे रास्तच होते. नामदेव ढसाळादी कवींची दलित कविता हृदयजीवनाच्या आकृतिबंधाची सर्जना ध्येय वाक्य मानते.त्या वृत्तीसंघर्षातून भेटणारे आशयाचे घाटगर्भ चैतन्य ती सुचित्र करते. घाटाचा ती विचार करीत नाही. या कवितेचा घाट साध्य म्हणून येत नाही - फलश्रुती म्हणून येतो.यशवंत मनोहरानी [१] दलित कवितेच्या घाटाबाबत केलेले हे विवेचन या पार्श्वभूमीवर लक्षणीय आहे. प्रा.गंगाधर पानतावणे सांगतात,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेश नि आदेश झोपडीझोपडीत जिवंत ठेवण्यासाठी नेत्यांनी,कार्यकर्त्यांनी, अनुयायांनी नि कलावंतानी शिकस्त केली. रांगड्या कलावंतानी - शाहिरानी तर समाजकर्तव्य म्हणून लेखणी झिजवली. गावोगाव फिरले.आंबेडकरी चळवळीतील ठिणग्या अधिक प्रज्वलित केल्या.छंदवृत्त,मात्रा यांची गरज त्यांना वाटली नाही."लिहिणे ","गाणे","आणि " जागविणे " हेच त्यांचे जग.... मानसिक परिवर्तनाला सामोरी जाणारी दलित लोक कवींची रचना आंबेडकरी चळवळीचा साधनरूप इतिहास होय.

दलितांची बंडखोरी फॅार्म ( Form ) बाबत प्राधान्याने नाही, ती अनुभवाशी,सामाजिक जीवनाशी बांधील आहे. कारण दलित कविता

ज्या संवेदनशीलतेवर आधारलेली आहे. ती संवेदनशीलता हीच मुळात वेगळी आहे. नामदेव ढसाळांची कविता वाङ्मयात कलाकृती म्हणून जागा मिळविण्यासाठी जन्माला आलेली नाही. वाङ्मय होणे ही तिच्या कार्याची अंतिम फलश्रुती आहे. एक परिणाम आहे. पण या परिणामासाठी तिचा जन्म नाही. समाज वास्तवाच्या पुनर्मांडणीच्या प्रक्रियेचे साक्षातीकरण हा तिचा जन्महेतु आहे. तिचे हे एकमेका द्वितीय साध्य आहे.

नामदेव ढसाळांच्या कवितेचे महत्व त्यामधून व्यक्त झालेल्या मूल्यगर्भ आशयासाठी, त्यातील सामाजिक जाणिवेसाठी मानायला हवे. त्याचे कारण असे की, दलित साहित्य जर जाणून घ्यायचे असेल तर या देशातील सामाजिकतेचा संदर्भ आणि इतिहास लक्षात घेतल्या वाचून पुढे जाता येणार नाही. इथे पारंपरिक कलामूल्याकडे पाहण्याचीही दृष्टी बदलली पाहिजे. उदा. कवितेची रूपरचना कशी आहे, तिला अंगभूत लय आहे कां, तिला नाद, त्यातील अलंकार, कल्पना विलास यापेक्षाही त्यामध्ये असलेले वास्तवतेचे भान इकडे अधिक लक्ष वेधले पाहिजे, त्याकडे भान वळविले म्हणजे या कवितेतील सृजनशीलता जाणवेल.

नामदेव ढसाळांच्या साहित्यात त्या कलाकृतीच्या आविष्काराला प्राधान्य नाही तर त्या कलाकृतीमध्ये असलेल्या मानवी मूल्यांची जाण, सखोलता यांना आहे. एक गोष्ट इथे प्राधान्याने लक्षात घ्यावी लागते ती ही की, कवितेच्या बाबतीत आशय आणि अभिव्यक्ती याचे इतके सरळ सरळ वर्गीकरण करावयाचे नसते. कारण खरी कविता अनुभवातून आकार घेते. शब्दरूप पावते, दलित कवितेच्या मूल्यमापनात आपण तिच्यातील आशय वेगळा काढून मूल्यमापन करीत नसून तो आशयच त्या कवितेला देत असलेले अभिव्यक्तीचे रूप अटळ आहे असे मानीत आहे.

कविता म्हणजे अनुभव ! कवीला आलेला अनुभव परंपरेने घालून

दिलेल्या तंत्रातच बसला तर त्याला कविता म्हणावयाचे अशी मर्यादित दृष्टी स्विकारून चालणार नाही. कविता ही कालपरत्वे बदलते.व्यक्तिपरत्वे कलाकृतीला येणाऱ्या भिन्न आकाराबरोबरच कालपरत्वे येणारा भिन्न आकार व वाङ्मयप्रकाराच्या बदलणाऱ्या संकल्पना या जरूर लक्षात घ्यायला हव्यात.

कलावाद्यांचे अध्वर्यू वॉल्टर पेटर म्हणतात की, "श्रेष्ठ साहित्यात वा कलेत आविष्काराला वा रूपाला महत्व नसून त्यात व्यक्त झालेल्या आशयात व विषयवस्तूत सामावलेल्या मानवी मूल्यांचा आवाका आणि सखोलता ह्यांना आहे" नामदेव ढसाळांची कविता ही जगणाऱ्यांची कविता आहे. त्यांची कविता ही त्यांच्या जीवनातून निर्माण झालेली आहे.नामदेव ढसाळांनी स्वत:च्या जळजळीत जीवनानुभवांचे स्वत:शीच केलेले चिंतन त्यांच्या कवितेचे अपरिहार्य रूप बनले आहे.

दलित आकृतिबंधाची अर्थपूर्णता दलित जाणिवांच्या अर्थपूर्णतेची द्योतक असते.नामदेव ढसाळांच्या "पाणी" सारख्या कवितेत प्राथमिक गरजांचा संघर्ष सुचविणारा आकृतिबंध दिसतो तर त्याची "निमित्त १५ ऑगस्ट ७१ " ही कविता सांस्कृतिक कलहाची व्यंजक ठरते.त्यातील शब्द,वाक्प्रचार,लय, आशय व या सर्वातून आलेला दलित घाट लक्षणीय आहे. आणि म्हणून प्रा.रा.ग.जाधव म्हणतात [२] त्याप्रमाणे दलित आकृतिबंधाची महात्मता अखेर दलित जीवन मूल्यांच्याच आधारे निश्चित करावी लागेल.

<u>व्यक्तिचित्रण :</u>

नामदेव ढसाळादी दलित कवींनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे प्रभावी आहेत. एखाद्या कुटुंबात असणारा आजा,लेकरावर कणखरपणे मायेची पाखर घालणारी आई, तर धकाधकीच्या जीवनामध्ये कुठेतरी जाणवणारी प्रेयसी ही सुध्दा या कवींनी रेखाटली आहे. दलितांची प्रेमकविता अर्थात प्रेयसीच्या सौंदर्याचं किंवा "केवळ तू नि मी प्रेमाचे गाणे गाऊ " असे म्हणणारी नाही.

त्यांची प्रेयसी ही सुध्दा त्याच्या वाट्याला आलेल्या जीवनाचाच एक अविभाज्य भाग आहे. डॉ. आंबेडकरांचे महामानवी शिल्पकार,घटनाकार, बोधिसत्वकार म्हणून रेखाटलेले रूप, श्रीबुध्ददेवाचे आश्वासक म्हणून भेटलेले रूप अशी अनेक व्यक्तिरूपे दलित कवितेने समर्थपणे दिली आहेत.

" हा आपला बाप अंधार वाहून वाहून अखेर पोक्या झाला "
" बापाचा रक्ताळलेला पुट्टा "

नामदेव ढसाळांनी अशा ओळीतून बापाचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे तर आईचे चित्र असे --

" मला जन्म देणारी गेली
आकाशीच्या बाप्पाकडे
फूटपाथी मुतांच्या वासाला कंटाळून
लुगडयातला अंधार धुण्यासाठी "

" अशीच व्यक्तिचित्रे बुध्द,आंबेडकर यांची रेखाटली आहेत " डॉ.आंबेडकर " ही दीर्घ कविता अशी आंबेडकरांचे व्यक्तिचित्र रेखाटणारी आहे.

व्यक्तिचित्रण हा वाङ्मयातील महत्वाचा घटक आहे. वाङ्मयकृतीला सामान्यतेच्या कक्षेतून उचलून अलौकिकतेच्या प्रांतात नेऊन ठेवण्याचे सामर्थ्य व्यक्तिचित्रण व स्वभावलेखन कलेत असते. वाङ्मयात निर्माण होणारी ही व्यक्तिरेखा वाचकाला आकर्षक वाटावी व तिने अनेकांच्या सुखदु:खाचे,आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करावे, याची खबरदारी लेखकाने घेणे आवश्यक असते.लेखकाने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखांशी वाचक तादात्म्य पावला तर वाङ्मयात खरा रस निर्माण होऊ शकतो.यासाठी स्वभाव लेखनासाठी निवडलेली व्यक्ती " प्रतिमा " असावी लागते.म्हणजे तिची सुख - दु:खे ही आपली सुखदु:खे, तिच्या आशाआकांक्षा ध्येय ह्या आपल्या आशा-

आकांक्षा ध्येय वाटणारा समाजात अेकबराच मोठा वर्ग असावा लागतो. ती व्यक्तिरेखा मानव जातीची प्रतिनिधी असावी लागते म्हणून हॅमिल्टन म्हणतो, " ललित कृतित येणा-या प्रत्येक व्यक्तीच्या अंगी सामान्य गुण असलेच पाहिजेत.सामान्य व विशेष असले तर चांगलेच पण केवळ विशेषगुण असणा-या व्यक्ती ललितकृतीत येणेच शक्य नाही.

"पण लक्षात कोण घेतो ? " मधील यमु ,"जादुगार " मधील इंदुमती, "दौलत " मधील निर्मला या व्यक्तिरेखा "प्रतिमा" असल्यामुळे वाचक त्यांच्याशी अेकरूप होऊ शकतो. "प्रभूरामचंद्र","श्रीकृष्ण","बिरबल" ह्याही अशा " प्रतिमा" च आहेत.

ढसाळांच्या साहित्यातील "आई","बाप" ,"आजा","प्रेयसी", ह्या जशा"प्रतिमा" आहेत तसेच "डॉ.आंबेडकर", हीही "प्रतिमा" च आहे. "बुध्द" ही ही व्यक्तिरेखा प्रतिमा होऊनच पुढे येते. ह्या व्यक्तिरेखा एका मोठ्या समाज गटाच्या प्रतिनिधिक व्यक्तिरेखा आहेत.

या ठिकाणी आणखी एक महत्वाचे वैशिष्टय सांगावे लागते ते हे की, बुध्द,आंबेडकर ,मार्क्स या सारख्या विभूतींना ही कविता मानत असली तरी ती विभूतिपूजनात्मक बनलेली नाही.

नामदेव ढसाळांच्या या दलित कवितेने निसर्गातील अनेक तत्वांना नवा अर्थ मिळवून दिला आहे. " पाणी" या निसर्गरूपाचा वेगळा अर्थ देताना "पाणी " हे पापपुण्याच्या पुढे धावत","पाण्यासारखं सुंदरकर्तव्य दुसरं कुठलं नसतं जगात" असे ही कविता म्हणत आंबेडकरांच्या रूपाने जाणवलेला तेजः-पुंज प्रज्ञासूर्य, उल्का मोजत चंद्रच न गवसल्याची जाणीव,भाकरीचा चंद्र शोधण्यात बरबाद झालेली जिंदगी - अशा चंद्र ,सूर्य,झाडे,अग्नी,पाणी ह्या निसर्ग तत्वांना येथे नवे अर्थ - मिळाले आहेत.तसेच सुरूंग,पाणी,अग्नी, तेज या गोष्टींना दलित कवितेत एक वेगळेरूप आहे. नामदेव ढसाळांची "पाणी" ही कविता लक्षात घेतली तर या कल्पनांना लाभलेला नवा अर्थ स्पष्ट होतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

दलित कवितेमध्ये बाप-लेक,माय-लेक, सासू-सून,अशा अनेक कौटुंबिक नात्यांची चित्रणेही आहेत. बुद्धयासाठी पैसे बाजूला ठेवून चष्मा आणणारा मुलगा, स्वत:च्या पायाच्या पिंढरीला कुत्रे चावून देखील बाळंतीण सुनेसाठी भाकरीचा गरम तुकडा आणणारी सासू,लेकरावर कणखरपणे मायेची पाखर घालणारी आई या दलितांच्या कवितातून आढळते. दलित कवितेला आधार आहे तो या कुटुंबाचा ! त्यामधील माणसांचा !! दलित कवितेतून येणारे हे मानवी नात्यातील परस्पर संबंधाचे चित्रण खरोखरच हेलावून सोडणारे आहे. त्यातील आईचे स्थान हे अधिक महत्वपूर्ण व वेगळे आहे. नामदेव ढसाळांच्या कविता म्हणजे याचे प्रत्यंतर आहे.

## "सूर्यवंशी" कविता : काही आक्षेप

दलित कवींच्या कवितामागील प्रेरणा वेगळ्या आहेत.तसे मराठीतील अन्य कवितेपेक्षा दलित कवितेचे जग निराळे आहे. वसंत बापटांनी चेहरामोहरा हरवून बसलेली कविता असे तिचे सार्थ वर्णन केले आहे. दलित कविता आपल्या भोवताल्च्या पारंपरिक साखळ्या तोडून मराठी कवितेच्या क्षेत्रात आज प्रतिष्ठा पावली आहे. नामदेव ढसाळ,केशव मेश्राम ,दया पवार,नारायण सुर्वे,त्र्यंबक सपकाळे,चंदवणाकर, निंबाळकर,डंगळे, ज.वि.पवार यांचे कविता संग्रहच साक्ष देऊ शकतील. याशिवाय यशवंत मनोहर,राजा ढाले,चोखा कांबळे,नीलकान्त चव्हाण,अरूण कांबळे,धनराज डहाट, मोरेश्वर वहाणे,बबन चहांदे,दामोदर मोरे,प्रकाश खरात,सुगत थोरात, हरीश बनसोडे,चंद्रकान्त वानखेडे,धर्मराज निमसरकर,नारनवरे, रतनकुमार पाटलीपुत्र, माधव कोंडविलकर असे कितीतरी कवी दलित कवितेला समृध्द करीत आहेत. ही कविता छंदबध्द, नादमधुर, अलंकारप्रिय नाही तर विद्रोहाची आग फुलवणारी, चीड संताप व्यक्त करणारी आहे. तिने स्वार्थाने कवितेच्या व्याकरणाची मोडतोड करून टाकली आहे. प्रा.त्र्यं.वि.सरदेशमुख या संदर्भात,म्हणतात,"मर्ढेकरांच्या मागे संवादाला पाठमोरी होणारी कविता लिहिण्याचा जो गदारोळ येथे निर्माण

झाला त्याला जबर प्रत्याघात कुणी दिला असेल तर मराठी दलित कवितेने " ( अस्मितादर्श, दिवाळी अंक,७७ ) हे खरेच आहे. दलितांच्या कवितेचा जन्म जसा दलितवर्गासाठी आहे तसा आपल्या वर्गाबाहेर पसरलेल्या समाजासाठी आहे. कारण ही कविता जरी विशिष्ट वर्गाची दु:खे मांडीत असली तरी ती अखेर कविता आहे. ती स्वार्थ आहे तशी परार्थ आहे. केशवसुतांप्रमाणे दलित कवीला वाटते आहे की, जिकडे तिकडे माझी भांवडे दिसताहेत. ती पीडितांचे दु:ख व्यक्त करण्यात रंगली आहे तशीच ती सामाजिक विषमतेवर घणाघात घालीत आहे.ती "सूर्यवंशी" आहे. आणि घराघरांतून सूर्य पेटत चालल्याची ग्वाही देत आहे.

नामदेव ढसाळांची कविता ही अन्य दलितांच्या कवितेपेक्षा अंतर्बाह्य निराळी आहे. मर्ढेकरांच्या कवितेतून येणारे जीवनदर्शन जसे मराठी कवितेला नवीन होते, तसे ढसाळांच्या "गोलपिठा " मधील जीवनही अनोखेच आहे.मर्ढेकरांच्या कवितेने जसे रूढ अभिरूचीला हादरे दिले तसेच ढसाळांची कविता सर्वसामान्य वाचकाला - विशेषत: पांढरपेशा वाचकाला चक्रावून टाकणारी आहे.ढसाळांनी गोलपिठ्यावरील जगात जे भोगले ते कवितेत व्यक्त केले आहे.

नामदेव ढसाळांचा कल मार्क्सवादाकडे झुकता झुकताच त्यांचा " गोलपिठा" (१९७२ ) प्रकाशात आला व त्यातील भाषा व अनुभव यांच्या बेबंद मुक्तपणाने रूढ पारंपरिक संकेतांच्या मोडतोडीने, प्रस्थापितां विषयीच्या त्वेषयुक्त चिडीने,अन्याया विरूध्दच्या आक्रमक आवाजाने अनेकांची संवेदनशक्ती सुन्न झाली पण ढसाळांच्या कवितेला समूह-मन सापडले नाही. ती पांढरपेशांना मुद्दाम हादरवणारी अतिशयोक्तिपूर्ण होऊन विध्वंसाची भाषा करताना सर्वांनाच नाकारते,उत्कट अनुभवाचा प्रामाणिक आविष्कार जाणवत असला तरी तो दिशाहीन वाटतो.असे प्रा.निशिकांत ठकार[३] याचे विवेचन

आहे. तर नामदेव ढसाळ दलित कवीच नाहीत हे सिध्द करण्याचा प्रयत्न सौ.विजया राजाध्यक्ष करताना दिसतात.

ढसाळांच्या कवितेतील वास्तवदर्शन हे जरी एका समाज घटकाचे असले तरी त्याच्याकडे पाहणारी वृत्ती वा दृष्टी ही त्या समाजघटकाची नसून ढसाळ या कविव्यक्तीची आहे. सामाजिक वास्तवाचे दर्शन घडवीत असतानाच त्यातून भावी काळात प्रकट होण्याची शक्यता असलेल्या समूहमनाचे ढसाळ हे जणू अग्रदूत झालेले आहेत.म्हणूनच त्यांच्या कवितेतून समूहाच्या गर्जना ऐकू येत असल्यातरी त्या ढसाळांच्या व्यक्तिविशिष्टतेला लोपून टाकू शकत नाहीत. म्हणूनच या संदर्भात ढसाळांची कविता ही " दलितकविता" नव्हे,हे दाखविण्यासाठी " ढसाळ प्रकट करत असलेल्या जाणिवा या दलित समाजाच्या नाहीत " असाही आक्षेप घेतला जातो.यासाठी सौ.विजया राजाध्यक्ष आपले म्हणणे मांडताना म्हणतात की,[8] " आपल्या अस्मितेची जाणिव झालेला कोणताही कवी एकटाच असतो,तो स्वगतेच करतो आणि तो कोणत्याही विशिष्ट जीवनाशी बांधलेला असत नाही --"
सौ.राजाध्यक्षांचे हे विधान फसवे आहे. दलित कवींच्या कवितेत जो जीवनानुभव व्यक्त होतो, तो ते ज्या समाजात जगत असतात त्या समाजाचाच असतो.चोख्याचे अभंगातून जे दु:ख व्यक्त झाले ते एकट्या चोख्याचे नव्हते , ते माणूसकीचा हक्क नाकारलेल्या दलित समाजाचे दु:ख होते,ढसाळांची कविता "स्वगता" सारखी आहेहे कुणी नाकारणार नाही,पण या "स्वगता"चा उगम माणूस म्हणून जगणे नाकारणाऱ्या समाजाविरूध्द उदयाला आलेल्या विद्रोहात आहे, शतकानुशतके भोगाव्या लागणाऱ्या वेदनेत आहे.तेव्हा ढसाळ दलित कवी नाहीत हे सिध्द करण्याचा प्रयत्न सौ.राजाध्यक्ष करीत आहेत तोच चुकीचा आहे " ढसाळांच्या जाणिवा या दलित समाजाच्या नाहीत " किंवा " त्यांची जाणिव काहीशी पांढरपेशी आहे " असा आक्षेप घेणे अयोग्यच आहे.असा उपहास करण्याचे कारण नाही,कारण काव्यद्वारा

प्रकट होऊ इच्छिणारी कोणतीही जाणीव कांही अंशी पांढरपेशी होणे अपरिहार्यच असते. हीजाणीव अस्सल आणि स्वत:चीच अशी आहे किंवा नाही, हीच खरी महत्वाची गोष्ट असते.केवळ तपशीलामुळे कविता दलित ठरत नसते तर त्यांच्या मागील दलित जाणीव तिला दलित कविता ठरविते.ढसाळांच्या दलित जाणिवेचा अस्सलपणा संशयातीत आहे.

## नामदेव ढसाळ : दलित साहित्याचा मानदंड

"गोलपिठा" मधील ढसाळांची कविता ही अशी "दलित साहित्य या संज्ञेतील दलितत्वाचे सर्व घटक आविष्कृत करणारी कविता आहे.नामदेव ढसाळांची कविता हा दलित कवितेचाच नव्हे, तर एकूण दलित साहित्याचाही मानदंड ठरली आहे.ती स्वयंभू आहे.मराठी कवितेच्या प्रवाहात आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीनी ढसाळाची कविता तिच्या अंगभूत वेगळेपणाने चटकन लक्षात येते. ढसाळांच्या कवितेतील आशयाचे आणि ढसाळांच्या अभिव्यक्ती विशेषांचे अनुकरण ढसाळांच्या बरोबर व नंतर काव्यलेखन करणाऱ्या दलित कवीनी केलेले दिसते. या वरूनच ढसाळांच्या कवितेच्या श्रेष्ठतेची कल्पना येते.

विजय तेंडुलकर ढसाळांच्या कवितेबद्दल आणि ढसाळांच्या बाबत लिहितात,[१] " समाजातल्या दडपल्या थरातून आलेला ढसाळ हा काही पहिलाच कवी नव्हे.तो या थरातला पहिलाच गुणी कवी देखील नाही.परंतु मराठी कवितेच्या परंपरेचा काही वारसा घेऊनही तिच्यातले अर्वाचीन पांढरपेशे मन आपल्या कवितेत-सरकू न देणारा,आपल्या कवितेचा पिंड अंतर्बाह्य आपल्या जगाशी पक्का बांधला ठेवलेला आणि प्रयत्नात कोठेही खोटा,प्रचारकी वा कंठाळी न होणारा ढसाळ हा विरळा दलित कवी मात्र नक्कीच आहे " तेंडुलकरांच्या यामतात मोठा सत्यांश आहे हे खरे पण कवी ढसाळांचा भविष्यकाळ कसा असेल ते मला माहीत नाही असेही त्यानी पुढे स्पष्ट केले आहे.

ढसाळांच्या " गोलपिठ्याने " आपले कवितापण जपले आहे पण हे आत्मतत्व त्यांच्या नंतरच्या कवितेला सांभाळता आलेले नाही. " कविता लिहितो म्हणजे मी राजकीय कृतीच करतो" असे त्यांना वाटत राहिल्याने त्यांची पुढील कविता वक्तृत्वपूर्ण, शब्द उधळणारी, विचारप्रकरणात्मक, निबंधवजा, प्रचारकी आणि काव्यहीन झालेली आहे. इथे कवी ढसाळांवर त्यांच्यातील राजकीय कार्यकर्त्याने मात केलेली दिसते. आंबेडकर, मार्क्स, माओ सर्वांनाच बरोबर घेऊन क्रांती करण्याचा ध्यास त्यांना लागला आहे. पण त्याला वैचारिक अधिष्ठान नाही. गद्याचे परिच्छेद म्हणजे चिंतन नव्हे, तेव्हा दलित कार्यकर्ता व दलित कवी यांच्यातील सीमारेषेचे भान नामदेव ढसाळांनी सतत जागे ठेवले पाहिजे.

नामदेव ढसाळांच्या कवितेतून प्रकट होणाऱ्या काही सर्वसामान्य प्रवृत्ति विशेषांचा मागोवा आपण घेतला. तिच्या सामर्थ्याची आणि मर्यादांचीही कल्पना यावरून आपणास आली. चाकोरी बाहेरच्या अनुभव क्षेत्राचे आणि भावभावनांचे प्रभावी आविष्करण, अस्सल, प्रत्ययकारी जीवन दर्शन, उद्रेकी आणि प्रक्षुब्धभावचित्रण ही नामदेव ढसाळादी कवींची बलस्थाने आहेत. नामदेव ढसाळ हे दलित कवी पैकी एक असले तरी त्यांची कविता इतर दलित कवींच्या कवितेपेक्षा आपले वेगळेपण राखते. सामाजिक विषमतेच्या विरूध्दचा प्रक्षोभ आणि त्याही पेक्षा मानवत्वाच्या प्रतिष्ठेसाठी लढा ही त्यांची प्रमुख प्रेरणा आहे. "गोलपिठा" ह्या मुंबईतल्या बकाल वस्तीचे दर्शन, जीवन दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. माणसांना कसातरी आसरा देणारी गोलपिठ्यातील घरे, तेथील मोहल्ला, तेथील दुर्गंधी आणि स्वस्त अत्तराचे दर्प, भकास शांतता आणि कर्कश गोंगाट, तेथल्या माणसांचे चेहरे, तेथल्या नजरा, तेथल्या वेश्या, तरूण रोगी, दमेकरी बाप, भिकारी, बैरागी, भडवे, मैय्या आणि दादा या सर्वांना सामावून घेणारा "गोलपेठा" ढसाळांनी येथे उभा केला आहे. एका आपल्या जवळच्या पण अज्ञात जगाचे ज्ञान त्यामुळे घडते ; हे जीवन दर्शन मराठीत खरोखरच अपूर्व आहे ! विशेष हे की या जीवनदर्शनाने कलात्मकतेची पातळी गाठली आहे !

ढसाळांनी त्याला कवितापण दिले यातच त्यांचे खरे सामर्थ्य आहे.

ढसाळांच्या दलित कवितेच्या काही मर्यादाही आहेत. ढसाळांच्या कवितेचा आशय स्थिरकेंद्री स्वरूपाचा आहे.समाज व्यवस्थेने निर्माण केलेले दु:ख, नकार आणि विद्रोह यानी युक्त असा आशय त्यांच्या कवितेचा घटक झालेला आहे. आणि त्यांच्या दर्शनातही एक अटळ तोचतोपणा आलेला आहे.आशयाभिव्यक्तीची पुनरुक्ती,स्वनिर्मित संकेताच्या आहारी जाणे, अनुभवांच्या विस्तार क्षमतेची जाणीव प्रकट न करणे, विशिष्ट प्रतिमा व शब्द पुन:पुन: वापरणे यासारखे दोष त्यांची कविता वाचतांना जाणवतात-- पण नामदेव ढसाळ हे जसे समाजचिंतक आहेत तसेच आत्मचिंतकही आहेत.त्यानी या सगळ्या मर्यादा जाणल्या आहेत.आपल्यातील राजकीय कार्यकर्त्यांची त्यांना जाणीव आहे. दलित साहित्याच्या कोडकौतुकाचा काळ आता संपला असून दलित साहित्यिकांनी आता आपल्या वाटा,नवीन वाटा अंतर्मुख होऊन शोधाव्यास हव्यात हे त्यांनी जाणले आहे.अस्मिता दर्शच्या मेळाव्यात (मे १९८४ नागपूर ) अध्यक्षीय भाषणात[6] बोलूनही दाखविले आहे. दलित लेखकांनी अधिकाधिक अलिप्त राहून लिखाण केले पाहिजे, वाङ्मय निर्मितीही पवित्र असून ती निष्ठेने,सचोटीने व अभ्यासपूर्ण रीतीने कराव्यास हवी ही त्याची साहित्य कला विषयक भूमिका आहे.

दलित लेखकांनी आपल्या अनुभवांचे क्षेत्र अनुभव विश्व वाढविले पाहिजे आणि वास्तववादी कलात्मक आविष्कार आपल्या वाङ्मयातून केला पाहिजे असे प्राचार्य राम शेवाळकर म्हणतातत्यात सत्यांश आहे. आत्मचिकित्सेला प्रवृत्त झालेले नामदेव ढसाळ डॉ.सुधीर रसाळ सांगतात[7] त्याप्रमाणे संवेदनशीलतेचा ताजेपणा, नवेपणा टिकवून आपल्या अनुभवांच्या आंतरिक घाटातून निर्माण केलेलेश्रेष्ठ दलित साहित्य मराठी सारस्वताला देत राहतील.

भावी काळात दलित साहित्याची दलित साहित्यिकानाच गरज

वाटेल कां ? हाच खरा प्रश्न आहे. कारण पांचपचवीस वर्षांनी सामाजिक सुधारणेमुळे दलितत्व संपून गेले असेल,मग दलित साहित्य तरी कसे निर्माण होणार ? --- दलित साहित्याची आवश्यकता न वाटणे यातच दलित साहित्याची इतिकर्तव्यता आहे, दलित साहित्याचे हे ईप्सित पूर्ण करण्याच्या दृष्टीने दलित कवितेने आपले प्रस्थान ठेवले आहे, -- हे खरे असले तरी पांच पंचवीस वर्षानंतरच्या समस्याही वेगळ्या असतील,दलितत्वाचे घटकही वेगळे असतील. मानसिक दलितत्व,लैंगिक दलितत्व,इ.घटक नव्याने आकारतील आणि त्याबाबतच्या दलितत्वाच्या भावना जर शिल्लक असतील, आजच्या प्रमाणे त्या जर उत्कटत्वाने प्रकट होत राहतील तर त्याहीवेळी हे दलित साहित्य आकारात राहिल.त्याची गरज त्यांना भासेल.

नाम्देव ढसाळांच्या अनुकरणातून आज जे पददलितातून लेखक जन्माला येताहेत,त्यांच्या जवळ पुरेसा आत्मविश्वास आहे " मी बेहत्तर आहे, माझं लेखन जे आहे, ते वाङ्मयीन दृष्टया श्रेष्ठ दर्जाचे ठरो वा न ठरो, त्याची मला पर्वा नाही " अशी वृत्ती जी प्रा.वा.ल. कुलकर्णी अपेक्षितात⁶ ती या साहित्यिकांची बनते आहे. हे दलित साहित्यिक, दलित साहित्याच्या मर्यादा वा दलित साहित्यापुढील प्रश्न यांचा विचार न करता पु.ल. देशपांडे सांगतात⁷ त्याप्रमाणे,"दयेची अथवा अन्य कोणतीही अपेक्षा न बाळगता,माझे तुम्हाला ऐकावेच लागेल " अशा भक्कम समजुतीने उभे आहेत. दलित साहित्याच्या या विकसनशील अवस्थेत या नव साहित्यिकांची हीच भूमिका स्वागतार्ह आहे.

## संदर्भ,टीपा इ.


१ मनोहर यशवंत - स्वाद आणि चिकित्सा,धनंजय प्रकाशन, नागपूर,जानेवारी १९७८,पृष्ठ ९८-९९.

२ जाधव रा.ग. - निळी पहाट, श्री विद्याप्रकाशन,पुणे-३०, द्वि.आ.जून १९७९,पृ.५२.

३ ठकार निशिकांत - मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन

४ राजाध्यक्ष विजया - गोलपिठा : एक काव्यानुभव,सत्यकथा, जुलै १९७३.

५ तेंडुलकर विजय - गोलपिठा : नीलकंठ प्रकाशन,पुणे, १९७५ प्रस्तावनेतून,

६ ढसाळ नामदेव - अस्मितादर्शन,मेळावा,नागपूर, मे १९८४ - अध्यक्षीय भाषण, महाराष्ट्र टाईम्स,१४ मे १९८४.

७ रसाळ सुधीर - अस्मितादर्श,दिवाळी विशेषांक, १९७३.

८ कुलकर्णी वा.ल. - अस्मितादर्श, डिसेंबर,१९६७.

९ देशपांडे पु.ल. - एक प्रकाश यात्रिकांचा मेळावा, १० व ११ नोव्हें.,१९७९, उद्घाटनाचे भाषण.